# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad
Date – 04 December 2021
Time 18.10 to 18.20
Language Marathi

**आकाशवाणी औरंगाबाद**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक – ०४ डिसेंबर २०२१ सायंकाळी ६.१०**

****

कोविड प्रतिबंधक लसीकरण मोहिमेत देश दीडशे कोटी मात्रांच्या दिशेनं वाटचाल करत आहे. कोरोना विषाणूचा ओमायक्रॉन हा नवा प्रकार आढळून आल्यानं, चिंता वाढली आहे. सर्वांना आवाहन आहे की, लसीच्या दोन्ही मात्रा वेळेवर घ्या, तसंच ज्यांनी अद्याप लस घेतली नाही, त्यांना लस घेण्यासाठी सहकार्य करा. आपली आणि आसपासच्या सर्वांची काळजी घ्या. मास्क वापरा, सुरक्षित अंतर राखा, हात, चेहरा वारंवार स्वच्छ धुवा. कोविड 19 शी संबंधित अधिक माहिती आणि मदतीसाठी आपण ०११- २३ ९७ ८० ४६ आणि १०७५ या राष्ट्रीय मदत वाहिनीशी किंवा ०२०- २६ १२ ७३ ९४ या राज्य स्तरावरच्या मदत वाहिनीशी संपर्क करू शकता.

****

** राज्य लोकसेवा आयोगातर्फे पुढील वर्षी घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षांचं वेळापत्रक जाहीर

** परळी औष्णिक वीजनिर्मिती केंद्रात इंधन म्हणून बांबूचा वापर करण्यास राज्य सरकारची मंजूरी

** बालवाचकांनी साहित्याशी दोस्ती करावी - ज्येष्ठ अभिनेते तथा साहित्यिक दिलीप प्रभावळकर यांचं आवाहन

आणि

** न्यूझीलंडविरोधात मुंबई कसोटी सामन्यात भारताची दुसऱ्या डावात ३३२ धावांची आघाडी

****

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे पुढील वर्षी घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आलं आहे. आयोगामार्फत वर्ग एक आणि वर्ग दोन अंतर्गत विविध संवर्गांसाठी साधारण १३ प्रकारच्या परीक्षा वर्षभरात घेतल्या जातात. २०२१ वर्षाची राज्यसेवा पूर्व परीक्षा पुढील वर्षी २ जानेवारीला तर मुख्य परीक्षा ७, ८ आणि ९ मे रोजी घेतली जाणार आहे. २०२२ ची राज्यसेवा परीक्षा जून आणि ऑक्टोबर दरम्यान घेतली जाईल. आयोगाच्या संकेतस्थळावर आज हे वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आलं आहे.

****

परळी इथल्या औष्णिक वीजनिर्मिती केंद्रात दगडी कोळशाबरोबर इंधन म्हणून बायोमास ब्रिकेट अर्थात बांबूच्या तुकड्यांचा वापर करण्यास राज्य सरकारनं मंजूरी दिला आहे. या केंद्राच्या महानिर्मिती विभागातर्फे बांबू पुरवठ्यासाठी निविदा काढण्यात आली असल्याची माहिती, राज्य कृषी मूल्य आयोगाचे माजी अध्यक्ष पाशा पटेल यांनी दिली. पटेल यांनी या संदर्भात केंद्र सरकार तसंच राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. महानिर्मितीच्या औष्णिक विद्युत केंद्रात जैवभार अर्थात बांबूचा वापर करण्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्र्यांनी ऑगस्ट २०२१ मध्ये अभ्यास समिती गठीत केली होती. या समितीच्या अहवालानुसार बांबूला इंधन म्हणून मान्यता देत, वीज निर्मिती केंद्रातर्फे बांबूचे तुकडे पुरवठा करण्यासाठी निविदा काढण्यात आली. शेतकऱ्यांनी बांबूची जास्तीत जास्त लागवड करण्याचं आवाहन पटेल यांनी केलं आहे.

****

राज्य परिवहन महामंडळ – एसटी कर्मचाऱ्यांसोबतची शासनाची भूमिका ही लोकशाही विरोधी असल्याची टीका विधानसभेचे विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. ते आज औरंगाबाद इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. राज्य शासनानं या संदर्भात मेस्मा लावण्याऐवजी चर्चेतून मार्ग काढावा, असं आवाहन फडणवीस यांनी केलं.

****

बालवाचकांनी साहित्याशी दोस्ती करावी असं आवाहन, ज्येष्ठ अभिनेते तथा बालसाहित्यिक दिलीप प्रभावळकर यांनी केलं आहे. नाशिक इथं सुरू असलेल्या ९४

व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात आज प्रभावळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत बाल साहित्य मेळावा घेण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. पालकांनी मुलांमधील वेगवेगळ्या कलांकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचं मत प्रभावळकर यांनी व्यक्त केलं. साहित्य संमेलनात पहिल्यांदाच बालकुमार मेळावा घेण्यात आला, यामध्ये चित्रकलेसह विविध कलांचा समावेश करण्यात आला.
संमेलनात आज गझल संमेलन, रामदास भटकळ यांची मुलाखत, ऐसी अक्षरे अंतर्गत अच्युत पालव यांचं सुलेखन, तसंच दुपारच्या सत्रात ``संवाद लक्ष्यवेधी कवींशी`` हे कार्यक्रम झाले.

****

साहित्य संमेलनाला समांतर अशा दोन दिवसीय १५ व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाला आज नाशिक इथं सुरूवात झाली. आज सकाळी नाशिक शहरातल्या हुतात्मा स्मारक इथून विद्रोही साहित्य - संस्कृती विचार यात्रा काढण्यात आली. या विचार यात्रेत शालेय विद्यार्थ्यांसह विद्रोही सांस्कृतिक परंपरेच्या विविध संघटनांनी सहभाग घेतला. संमेलनाचे उद्‌घाटक डॉ. गौहर रझा, मावळते अध्यक्ष डॉ. प्रल्हाद लुलेकर यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

****

आज नौदल दिन. या निमित्त पश्चिम नेव्हल कमांडद्वारे मुंबईत जगातला सर्वात मोठा राष्ट्रध्वज फडकवण्यात आला. खादीपासून तयार करण्यात आलेल्या या ध्वजाची लांबी सव्वा दोनशे फूट, रुंदी दीडशे फूट तर वजन चौदाशे किलो इतकं आहे. ‘आझादी का अमृत महोत्सव’ या उपक्रमांतर्गत खादी आणि ग्रामोद्योग आयोगानं हा ध्वज तयार केला आहे.

****

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त राष्ट्रीय छात्र सेनेने ‘आझादी की विजय शृंखला` आणि `संस्कृती का महासंगम’ हे कार्यक्रम आयोजित केले आहेत. या कार्यक्रमातील `आझादी की विजय शृंखला` हा पहिला उपक्रम २८ नोव्हेंबर ते १० डिसेंबर दरम्यान होणार असून यात देशभरातल्या ७५ ठिकाणी १९७१ च्या युद्धातील शूरवीरांना सन्मानित करण्यात येणार आहे. याबरोबरच दिल्ली इथं ‘संस्कृतियों का महासंगम’, हे राष्ट्रीय एकात्मता शिबिर आयोजित केलं जाणार आहे. या शिबिरात

देशातल्या विविध भागातील छात्र आपापल्या राज्यांमधले स्थानिक नृत्य सादर करणार करणार आहेत. तसंच या कार्यक्रमात २२ भाषांमध्ये एकीकरण गीत गायलं जाणार आहे.

****

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान मुंबई इथं सुरु असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारतानं दुसऱ्या दिवशी दुसऱ्या डावात ३३२ धावांनी आघाडी घेतली आहे. त्यापूर्वी आज सकाळी भारतानं आपला पहिला डाव कालच्या चार बाद २२१ धावांवरून पुढे सुरू केला. न्यूझीलंडचा गोलंदाज एझाज पटेलनं ४७ षटकं आणि ५ चेंडूत १२ निर्धाव षटकं टाकत ११९ धावात भारतीय संघाचे सर्व गडी बाद करण्याचा विक्रम केला. त्यानंतर पहिला डाव खेळण्यासाठी आलेला न्यूझीलंडचा संघ २८ षटकं आणि १ चेंडूची खेळी करत अवघ्या ६२ धावांवर सर्वबाद झाला. भारताच्या मोहम्मद सिराजनं ३, रविचंद्रन अश्विननं ४, अक्षर पटेलने २ आणि जयंत यादवने एक गडी बाद केला. आज दुसऱ्या दिवसाचा खेळ थांबला तेव्हा भारतानं दुसऱ्या डावात ६९ धावा करत, सामन्यात ३३२ धावांनी आघाडी घेतली. मयांक अग्रवाल ३८ तर चेतेश्वर पुजारा २९ धावांवर खेळत आहेत. दरम्यान, भारताचा दक्षिण अफ्रिकेचा १७ डिसेंबर पासून सुरू होणारा दौरा आता, २६ डिसेंबर पासून सुरू होणार असल्याचं वृत्त आहे.

****